**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
===========================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
----------------------------------------------------------------------------------------------------
**Vol 11.Issue 3; March 2024**
===========================================================

# मराठी संताचेव्यक्तीमत्वआणि कर्तव्य .

डा .एम.एफ.राऊतराहे.
प्राध्यापक आणि विभाग प्रमुख .
श्री .शिवाजी महाविद्यालय परभणी.

प्रस्तावनाः आज मराठी संताचे व्यक्तीमत्व आणि कर्तव्य हा विषय समाज जागृतीसाठी पुढे येत आहे .संतमहात्माचे विचार ही मिळाली एक जगाला मोठी देणगी आहे .संताचे विचार समाजाला मुल्य प्राप्त करुन देत असतात.माणसाला सातविक विचार प्रेरित करण्यासाठी संताचे योगदान महत्त्वाचे आहेत .वारकरी पंतांना भक्ती भावना जागृतकरण्यासाठी ज्ञानदेवांनी चांगले योग्य मौलाचे मार्गदर्शन केले आहे .संतनामदेवानी मानवी जीवन आनंदी राहण्यासाठी अभंग रचना केली आहे "सुखी जीवनाचे पंचशिल,भगवत गीतेचे पंचप्राण"यासारख्या लेखनातुन संताचे विचार दिसून येतात .भोगानंद ,भावानंद आणि आत्मानंद हाच देहाकडून मन व नंतर आत्मविकास होय.संताने प्रयत्नवाद,अहंकार नाश ,लोकसंख्या ,भक्ती आणि कर्म-ज्ञान यांचा समन्वय हे पंचप्राण म्हणजे आमच्या आत्मविकासाचे पाच टप्पे आहेत .स्वामी विवेकांनद,

संत तुकडोजी यांच्या प्रमाणेच ,रामकृष्ण परमहंस,गाडगेबाबा यांच्या विचारांचा आदर्श आपल्यालाही दिसून येतो. आजच्या मानवी जीवनाच्या समतुल्य विकासात स्वप्न साकार करणारे तत्त्वज्ञान म्हणजे पूर्णवाद होय.मानसाच्या जीवन जगन्यात ईश्वर असतो ,असे संताचे बोल आहेत .आधूनिक काळामध्ये मनुष्याची जीवनलालसा कमी झालेली आढळून येते .प्रत्येक व्यक्ती च्या जीवनात नैराश्य निर्माण झाले आहे .माणूस नेहमी उदासीन राहत आहे .त्याला कामाचा कंटाळा येत आहे .अशा वेळी मुनुष्याला संतरुपी अमृत मिळावे.यासाठी संवाङमयाचा अभ्यास करणे काळाची गरज आहे .

संशोधन विषयाची मांडणीः

मनुष्याने आपले सर्वांगीण जीवन घडवतांना अज्ञान आणि अवगुणांचा त्याग करावा .याच बरोबर सदगुणांची जोपासना करावी .असे केल्यास मनुष्याचे जीवन सुखीसंपन्न होईल .संशोधन साहित्याच्या आधारे स्वभाषा,स्वधर्म ,स्वदेश याबाबत अभिमान आणि महाराष्ट्राचा धर्म यावर थोरसंतानी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे . मराठी संताने केवळ व्यक्ती ,समाज यां ची उन्नती केली नाही तर,स्वभाषा,स्वदेश आणि स्वदेव यांच्यावर प्रेम करायला लोकांना आपल्या साहीत्यातुन शिकविले ,संतांनी देवदेव,उपासना ,नामस्मरण भक्ती आणि परमार्थ यांचाच केवळ पुरस्कार केला नाही .तर आपल्या प्रपंच्यासाठी लागणारे सदगुण स्वीकारावे असे संताने वर्णन केले आहे .

आपल्या देशामध्ये मराठी संताचे कर्तव्य आणि योगदान समाज सुधारण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे वाटते . प्रत्येक माणसाने त्याच्यांतील आळस ,अज्ञान ,अवगुण आणि इतर व्यक्ती चा अपमान न करता समाजातील विवेक जागृती चे कार्य करावे .म्हणजे माणसाचे भाग्य उजळले जाते .असे संताना त्यांच्या कर्तव्यातुन सांगायचे आहे . विषय निवडीचा उद्देशः खरोखरच अलीकडच्या काळामध्ये मराठी संताचे कर्तव्य आणि व्यक्तीमत्व याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत जावा,लोकांना साहित्याची जाणीव व्हावी ,माणसातला

मोठेपणा ,सदवर्तन,वैचारिक दृष्टी वाढत जावी,वाचकांना मराठी साहित्याची आवड निर्माण व्हावी ,या उदेशाने या विषय हा संशोधनासाठी निवडला आहे .एवढेच नव्हे तर संताचे मौलिक विचार देशातील सर्व लोकापर्यंत जावे.वारकरीपंताची माहिती सामान्य जनतेला व्हावी .असे या महत्त्व पुर्ण विषयातुन स्पष्ट करायचे.मला असे वाटते कि,आजच्या समाज सुधारणे साठी,संतज्ञानेश्वर महाराज ,संत नामदेव, संत एकनाथ यांच्या विचाराची समाजाला गरज आहे .असे संशोधनाच्या रचनेचे स्वरूप पाहता लक्षात येते .माझे संशोधन तळागाळातील लोकांपर्यंत जावे, अनेक तरुण पिढीतील विद्यार्थी संशोधनासाठी जागृतव्हावे ,आदर्श समाज निर्माण व्हावा,हा खरा संशोधना मागचा हेतु आहे .

संशोधनाची गृहीतके:

(1) मराठी संताचे व्यक्तीमत्व आणि कर्तव्य याची जाणीव ठेवून सखोल अभ्यास करणे .

(2) समाजातील सर्व लोकांनी संताचे मौलिक विचार आचरणात आणावे .

(3) वारकरीपंताचा आदर्श समोर ठेवून संतसाहित्याचा गाढा अभ्यास करावे .

(4) समाज सुधारण्यासाठी,संत ज्ञानेश्वर महाराज , नामदेव महाराज यांच्या विचारांची गरज आहे .

(5) मराठी भाषेचे कौशल्य वाढण्यासाठी थोर संताचे विशेष मार्गदर्शन हवे आहे .

संशोधनाचे महत्त्व: देश पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर मराठी साहित्याची खूप मोठी आवश्यकता आज समाजाला भासू लागली आहे .संताच्या विचारातून गुणवान,सात्त्विक विचारांचे आदर्श लोक घडत आहेत . भारताची संकृती जपण्याचे कार्य हे बसवेश्वर महाराज ,ज्ञानेश्वर महाराज 'संत नामदेव महाराज यांनी केले आहे .समाजात सामाजिक मुल्य रुज विण्याचे विचार संताच्या वाणीतुन झाले आहे .ज्ञानेश्वर महारा जानी प्रबोधन करुन जनतेची मने जिंकली आहेत . संत विचाराची रचना करुन संत नामदेव महाराजांनी अभंग गाऊन जनतेला नेहमी आनंदी ठेवले आहे .मला असे सांगायचे आहे कि,आजच्या स्थिती मध्ये मराठी संताचे व्यक्तीमत्व आणि कर्तव्य फारच महत्त्वाचे आहे . मराठी संतसाहित्याचे योगदान: संत साहित्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते कि,वाचकांच्या दृष्टीने, तरूण पिढीच्या दृष्टीने संताचे व्यक्तीमत्वाचे योगदान महत्त्वाचे आहे .असे संशोधन पेपर मधून स्पष्ट सांगायचे आहे .उदाहरणार्थ भारताच्या सांस्कृतिक इतिहासात भक्त परंपरेतील एक आदर्श व्यक्तीमत्व संतनामदेव महाराज ,तसेच संत ज्ञानेश्वर महाराज होय.

सारांश आणि निष्कर्ष:

संताच्या दृष्टीने विठ्ठल ,शिव,विष्णू आणि पांडुरंग हे सर्व
एकच आहेत .संताचे विचार हे प्रभावी असल्यामुळे ते म्हणतात कि,जातीचा विचार हा खोटा आहे .मराठी संतांनी वेळोवेळी वार करीपंथाना योग्य ते मौलाचे मार्गदर्शन केले आहे .संस्कृतीचे जतन निश्चित या
मराठी संताच्यावाणीतुन होते .असे मला संशोधन पेपर
मधून सुचवायचे आहे .

मराठी संताचे व्यक्तीमत्व हे अध्यामिक ज्ञान असुन त्यां ची गरज भासत आहे .समाज जागृतीचे महत्त्वाचे वाक्य आहे .असे आपण समजून घेतले पाहिजे .

संदर्भ सूचीः

(1) https://mr.m,Wikiped,org,
(2) डा .डी.एस.कुलकर्णी -जगाच्या कल्याना संतांच्या विभूती.-रजत प्रकाशन औरंगाबाद .
(3) श्रीमद् भगवद् गीता .
(4) ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी .
(5) भक्तीमार्गातील दीपस्तंभ.( डा . हे.वि.इमानदार )
(6) सार्थ ज्ञानेश्वर महाराजांचा हारिपाठ(श्री दांडेकर)